महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ६४ वा | दिनांक : ०२/१२/२०२४ | वार : सोमवार

## सरकारच्या मुंडक्यावर पाय देऊन आरक्षण घेऊ : मनोज जरांगे



**तुळजापूर** : मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी आज तुळजापूर येथे तुळजाभवानी मातेचे दर्शन घेतले. दर्शनानंतर बोलताना त्यांची आंदोलनाबाबत मोठी घोषणा केली. मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणावरून पुन्हा एकदा सरकारला इशारा दिला आहे. पुढील आंदोलन मुंबईतील आझाद मैदानावर होऊ शकते, असे मनोज जरांगे म्हणाले. सरकार कुणाचेही आले, तरी मुंडक्यावर पाय देऊन आरक्षण घेणार, असा इशाराही मनोज जरांगे यांनी यावेळी दिला.

मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे या मागणीवर मनोज जरांगे ठाम आहेत. दरम्यान, मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर विधानसभा निवडणुकीत मराठा समाजाचे उमेदवार रिंगणात उतरवण्याची तयारी देखील केली होती. मात्र, फॉर्म्युला जुळत नसल्याचे सांगत त्यांनी ऐनवेळी माघार घेतली. फॉर्म्युला जुळला असता, तर सुफडा साफ केला असता, असेही जरांगे यावेळी म्हणाले.

मराठा आरक्षणाची चळवळ थांबणार नाही. सरकार कोणाचे आले तर आम्हाला फरक नाही. मराठ्यांना आरक्षण हवे आहे यापुढे आरक्षणासाठी मुंबई येथील आझाद मैदानावर सामूहिक उपोषण होऊ शकते, असा इशारा सरकारला दिला आहे. सरकार कुणाचेही असले, तरी मुंडक्यावर पाय देऊन आरक्षण घेणार. महाराष्ट्रामध्ये मराठ्यांशिवाय सत्ता स्थापन होऊ शकत नाही, यावेळी मराठा समाजाने ओबीसी आमदार सुद्धा निवडून आणले आहेत. विधानसभा निवडणूक लढविण्याचा फॉर्म्युला जुळला नाही, नाहीतर सुफडा साफ केला असता, असेही ते म्हणाले.

दरम्यान, विधानसभा निवडणुकीचा निकाल लागून सत्ता स्थापन झाल्यानंतर मराठा आरक्षणासाठी सामूहिक उपोषण करण्याचा इशारा मनोज जरांगे यांनी यापूर्वीच दिला आहे. सत्ता स्थापन झाल्यानंतर आपण सामूहिक उपोषणाची तारीख जाहीर करणार असल्याचे मनोज जरांगे म्हणाले होते. त्यामुळे आता पुन्हा एकदा मनोज जरांगे पाटील उपोषण सुरू करण्याची शक्यता आहे. त्यांनी आज दिलेल्या उपरोक्त इशाऱ्यानंतर ते मुंबईतील आझाद मैदानात उपोषण करतात की, आंतरवाली सराटीमध्ये उपोषणाला बसतात, हे पहावे लागणार आहे.

## उद्धव ठाकरे सोबत असते तर आणखी बहुमत मिळाले असते : रावसाहेब दानवे



**मुंबई** : उद्धव ठाकरे सोबत असते तर आज जेवढे बहुमत मिळाले आहे, त्यापेक्षा जास्त बहुमत आम्हाला मिळाले असते, असे विधान भाजप नेते रावसाहेब दानवे यांनी केले आहे. शिवसेना कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेससोबत गेली नसती तर २०१४ ते २०१९ या काळात जसे सरकार चालवले गेले तसे आताही सुरू असते. या कारभाराच्या जोरावर आम्हाला यापेक्षा जास्त जागा मिळाल्या असत्या, असा विश्वास रावसाहेब दानवे यांनी व्यक्त केला आहे.

विधानसभा निवडणुका पार पडल्या, आता सरकार स्थापन करण्याच्या हालचाली सुरू आहेत. तसेच मुख्यमंत्री कोण होणार याकडे देखील सर्वांचे लक्ष आहे. यावर बोलताना रावसाहेब दानवे म्हणाले, मुख्यमंत्रिपद कोणाला हा प्रश्न सगळ्यांनाच पडला आहे, मात्र मुख्यमंत्री कोण हे आमचे ठरले आहे. मात्र जोपर्यंत वरिष्ठांची सही होत नाही, तोवर अधिकृतरित्या नाव जाहीर केले जात नाही, असा आमच्या पार्टीचा विषय आहे. जोवर वरिष्ठांचा शिक्का बसत नाही, तोवर मुख्यमंत्रिपदी कोण? याबाबत कुठलीही घोषणा होणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

रावसाहेब दानवे म्हणाले, सगळे ठरल्याप्रमाणेच होणार आहे, प्रसंग, वेळ पाहून आम्ही सगळे करत असतो. वेळही ठरवली आहे, तारीखही ठरवली आहे. पाच तारखेला मुख्यमंत्र्यांचा शपथविधी आहे, आधी विधिमंडळ पक्षाची बैठक होईल, नेता निवडला जाईल आणि त्यानंतर मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर केला जाईल. जो कोणी आमचा नेता निवडला जाईल तो आमचा मुख्यमंत्री असेल. सगळे ठरले आहे. बॉसचा शिक्का झाला की सगळे समजेल, असे रावसाहेब दानवे म्हणाले.

## शरद पवार गटाच्या गटनेतेपदी जितेंद्र आव्हाड : मुख्य प्रतोदपदी रोहित पाटील, तर उत्तम जानकरांची सहप्रतोदपदी निवड

**मुंबई** : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या गटनेतेपदी जितेंद्र आव्हाड यांची निवड करण्यात आली आहे. दिवंगत नेते आर.आर. पाटील यांचे चिरंजीव रोहित पाटील यांना मुख्य प्रतोद पदाची जबाबदारी देण्यात आली आहे. तर सहप्रतोदपदी उत्तम जानकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विधीमंडळ पक्षनेत्याबाबत लवकरच निर्णय होईल, अशी माहिती शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी दिली.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाची आज पक्ष कार्यालयात बैठक पार पडली. या बैठकीत विधीमंडळ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील विधानसभेतील राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे गटनेते म्हणून जितेंद्र आव्हाड यांची निवड करण्यात आली. तसेच पक्षाचे मुख्य प्रतोद म्हणून रोहित पाटील यांची तर प्रतोद म्हणून उत्तम जानकर यांची नियुक्ती करण्यात आली.

विधीमंडळातील विधानसभेचे काही सदस्य बैठकीसाठी उपस्थित न राहिल्यामुळे विधीमंडळ पक्षाच्या नेत्याबाबत पुढील काळात होणाऱ्या बैठकीत निर्णय घेतला जाईल. आज १० पैकी ९ सदस्य बैठकीसाठी उपस्थित होते. असे जयंत पाटील यांनी सांगितले.

विधीमंडळात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष महाराष्ट्रातील जनतेचे प्रश्न धडाडीने मांडेल. आमची संख्या कमी असली तरी जितेंद्र आव्हाड यांच्या नेतृत्वात आमचे विधानसभेचे सर्व सदस्य चांगली कामगिरी करतील, असा विश्वास जयंत पाटील यांनी व्यक्त केला.

विधानसभा निवडणुकीत ५ वाजेनंतर ८ टक्क्यांपेक्षा जास्त मतदान वाढलेले आहे. मतदान झाल्यानंतर एवढ्या प्रमाणात मतदान वाढत असेल, तर ही चिंतेची बाब आहे. याबाबत सर्वांनी चिंता व्यक्त केली. हे मतदान कसे वाढले, असा सवाल जयंत पाटील यांनी केला. अतिरिक्त वाढलेल्या मतदानाची चौकशी झाली पाहिजे. निवडणूक आयोगाने दोन दिवसांनंतर त्यांची वेबसाईट बंद केली. लोकांना माहिती उपलब्ध होणार नाही, याची काळजी घेतली. हा गंभीर गुन्हा निवडणूक आयोगाने केला आहे, असा आरोप जयंत पाटील यांनी केला. ईव्हीएम मशीन आपल्या ताब्यात येत नाही, तोपर्यंत काही प्रश्नांची उत्तरे मिळू शकणार नाहीत, असेही जयंत पाटील म्हणाले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २ डिसेंबर २०२४


## काळया कुट्ट अंधारात, प्रकाशाची लख्ख वाट दिसावी... कवयित्री अपर्णा धाटबळे



**कन्नड (अरुण थोरात):** सहकार महर्षी बाळासाहेब पवार सा. वाचणालयात जेष्ठ साहित्य प्रा. अंबादास सगट यांच्या अध्यक्षतेखाली दि. ३० नोव्हेंबर रोजी पहिल्या कविसंमेलनांचे आयोजन करण्यात आले होते.

प्रमुख अतिथी म्हणून प्रा.रंगनाथ लहाने, डॉ यशवंत पवार मार्गदर्शन केले. कवियत्री अपर्णा धाटबळे यांनी आपल्या कवितेतून "शब्दांची अशी जादू व्हावी दुःख कवेत घेतले जावे सुखाची उधळण व्हावी काळया कुट्ट अंधारात प्रकाशाची लख्ख वाट दिसावी" मंत्रमुग्ध केले.

कवी ज्ञानेश्वर गायके यांनी "इथं ते अंगण नाहीगावातील मातीचं सडा रांगोळीन सजलेलंमाणुसकीन रुजलेलं" यांतून गावांचे बदललेले रुप मांडले.

कवी लक्ष्मण वाल्डे यांनी "सद्गुरु नाथा मी आता हो तुझा होऊ पाहतोदे शक्ती मला तुझ्या भक्तीची मी ही तुझा होऊ पाहतो"भक्ती रसाचे शिंपण केले.

कवयित्री शुभदा देवरे यांनी "उमलले खड्डे बघा सौंदर्य खेड्या पाडयातलेटाळुनी टळलेच नाही, रस्ते खड्डयातले तळयात-मळयात खेळायाचे स्वप्न झाले पुरेअच्छे दिन बघाया तुम्ही एकदा याच बरे!" या शब्दांतून रस्त्यांतील खड्ड्यां वर कोपरखळी टाकली.

कवी सुदाम आगळे यांनी आपल्या कवितेत "माझ्या शेतकऱ्यांचा, कष्टकऱ्यांचा घामाचा प्रत्येक थेंब सुवर्ण कर, बाकी काही नको देव फक्त एवढ्याच मागण्या पूर्ण कर" अशी आर्त विनवणी केली.

कवी प्रविण दाभाडे यांनी "आधी आधार आधार आता आयडी अपार शिक्षकांच्या माथ्यावर अतिरिक्त कामांचा भार" शिक्षकांच्या व्यथा मांडल्या.

सुत्रसंचालनक कवियत्री अनिता राठोड तर आभार व्यवस्थापक नितीन वाकळे यांनी माणले. यावेळी याप्रसंगी कवियत्री समीक्षा भोंगळ, प्रविण दाभाडे, नंदूलाल कुच्चे, अतुल बागुल, मच्छिंद्रनाथ काकडे, योगेश कुंदे, शरद बागल, केशरचंद राठोड, जेष्ठ पत्रकार विठ्ठल शिरसे, प्रवीण जंजाळ, श्याम जाधव, कल्पना चव्हाण, मीना वडगुळे, श्री दूधकर आदी उपस्थित होते.

## समाजाच्या सेवेकरिता सदैव तत्पर राहणार : मनोज भाऊ पवार



**कन्नड (अक्षय चव्हाण):** नुकत्याच झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीच्या माध्यमातून प्रथमच राजकारणात उतरलेले उद्योजक मनोज पवार हे पराभूत झाले.

त्यांनी केलेले समाजकारण आणि प्रचारात मतदारांसमोर ठेवलेले व्हीजन पाहता त्यांना अतिशय त्रोटक मते मिळाली. हा पराभव त्यांनी मान्य केला. यापुढे कोणतीही राजकीय भूमिका आपली राहणार नाही असे त्यांनी जाहिर केले.

मतदारांच्या भेटीसाठी राजुरेश्वर येथे घेतलेल्या कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना ते म्हणाले की, जनतेचा निर्णय पूर्णतः मान्य करतो. यापुढे माझी कोणतीही राजकीय भूमिका नसेल. मात्र, समाजाच्या भल्यासाठी आणि मतदारसंघातील प्रगतीसाठी माझे प्रयत्न अखंड सुरू राहतील.

बेरोजगारीचा प्रश्नसोडवण्यासाठी आणि स्थानिकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्यासाठी मका स्टार्च उत्पादनावर आधारित फार्मा प्रोड्यूसर कंपनीच्या माध्यमातूनऔद्योगीकरण घडवून आणण्याचा निर्धार केला आहे.

या उपक्रमामुळे मतदारसंघात रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होतील आणि स्थानिक तरुणांना त्यांच्या कौशल्याचा उपयोग करून आत्मनिर्भर बनवता येईल.

हा प्रयत्न फक्त आर्थिक स्थैर्य देणार नाही, तर आपल्या मतदारसंघाच्या उज्ज्वल भविष्याचा पाया देखील रचेल. राजकीय भूमिका न घेता, उद्योग आणि रोजगाराच्या माध्यमातून समाजसेवेचा संकल्प पूर्ण करण्यासाठी नेहमी तत्पररहीन., अशी ग्वाही त्यांनी दिली.


**बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.**


## फुलेंनी रचला स्त्री शिक्षणाचा पाया : सावित्रीबाई फुले वरिष्ठ महाविद्यालय औराळा येथे वैशाली वारे यांचे प्रतिपादन

**कन्नड (अक्षय चव्हाण):** क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी पुण्यातील गजपेठेतील भिडे वाड्यात स्त्रीच्या शिक्षणासाठी शाळा सुरु केली. यातून स्त्री शिक्षणाचा पाया रचला, असे प्रतिपादन प्राध्यापक वैशाली वारे यांनी गुरुवारी केले.

तालुक्यातील औराळा येथील सावित्रीबाई फुले वरिष्ठ महाविद्यालयात क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्राध्यापक वैशाली वारे बोलत होत्या.

पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, मुलींच्या शिक्षणासाठी प्रथम सावित्रीबाई फुले यांना शिक्षण देत समाजसुधारणेची सुरवात जोतिबांनी स्वतःपासून केली. सावित्रीबाई फुले यांना शिक्षण देत महात्मा फुले यांनी शाळा चालवल्या.

महात्मा फुले यांचे सावित्रीबाई फुले यांच्या सक्रिय सहभागाच्या जोरावर स्त्री शिक्षणाचे आणि सामाजिक काम सुरु होते. स्त्री शिक्षासासोबत अस्पृश्य समाजाच्या हक्कासाठी आणि उद्धारासाठी महात्मा फुले यांनी काम केले.

महात्मा फुले यांनी विविध ग्रंथांचे लेखन देखील केले आहे. यावेळी उपस्थित संस्थेचे सचिव दीपक वारे यांनी सूत्रसंचालन केले.

तसेच प्रा.ए.एन. सुरडकर यांनी आभार मानले. या वेळी प्रा.अनिल टेलुरे, प्रा. रविकांत पवार, प्रा.दिलीप वाघ, प्रा. अमोल जाधव, पुष्कर भोजने, काजल पवार आदींसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.






## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात पोलीस व आर्मी भरतीपूर्व प्रशिक्षण अकॅडमी ची सुरुवात




**मुरुम (प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले)** : महाराष्ट्र राज्य उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान साहित्य केंद्र आयोजित करेल कथेच्या वतीने कट्टा च्या वतीने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना पोलीस आणि आर्मी भरती पूर्व प्रशिक्षण सुविधा उपलब्ध व्हावी म्हणून उमरगा येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय करिअर कट्टा एक्सलन्स सेंटर महाविद्यालय म्हणून निवड झालेल्या सेंटरमध्ये पोलीस व आर्मी भरती पूर्व प्रशिक्षण अकॅडमी सुरू करण्यास प्रमाणपत्र माहिती व तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे अध्यक्ष यशवंत शितोळे प्राचार्य डॉ हरिदास विधाते यांच्या शुभहस्ते प्राचार्य डॉक्टर संजय अस्वले यांना देण्यात आले.

पुणे येथील यशदा प्रशिक्षण केंद्रामध्ये युवा धोरण निश्चिती आणि पोलीस प्रशिक्षण केंद्र प्रशिक्षण दोन दिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेत महाराष्ट्रातील निवडक सेंटर ऑफ एक्सलन्स महाविद्यालयामध्ये करिअर कट्ट्याच्या वतीने पोलीस प्रशिक्षण अकॅडमी सुरू करण्यात आली आहे.

या कार्यशाळेसाठी उमरगा श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील प्राचार्य डॉ अस्वले आणि समन्वयक डॉ. ए के कटके, डॉ सी डी करे आणि पोलीस प्रशिक्षण केंद्राचे प्रशिक्षक मद्रे सर यांची उपस्थिती होती. यावेळी यावेळी करीअर कट्टा नागपूर जिल्हा समन्वयक डॉ रंजना जोवने मॅडम बीड जिल्हा समन्वयक डॉ नरसाळे यांची उपस्थिती होती.

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात सुरू असलेल्या पोलिस व आर्मी भरती पूर्व प्रशिक्षण अकॅडमी मध्ये ७० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे. या अकॅडमी मध्ये दररोज सकाळी आणि सायंकाळी फिजिकल प्रशिक्षण आणि दुपारी लेखी परीक्षेची तयारी करून घेतली जाते.

तसेच करियर कट्ट्याचे ऑनलाईन लेक्चर संध्याकाळी उपलब्ध आहे. मुलींसाठी वस्तीगृहाची स्वतंत्र सोय आहे. तरी अकॅडमीमध्ये प्रवेश घ्यावा असे आव्हान प्राचार्य आणि करिअर कट्टा समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २ डिसेंबर २०२४


## बीफ वाटून भाजपने निवडणूक जिंकली : काँग्रेसचा आरोप

**गुवाहाटी :** आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी शनिवारी भाजपच्या बैठकीनंतर प्रसारमाध्यमांना सांगितले की, काँग्रेसने लिखित स्वरूपात दिले तर ते राज्यात गोमांस बंदी करण्यास तयार आहेत. वास्तविक, समगुरी जागेवरील पोटनिवडणुकीसाठी १३ नोव्हेंबरला मतदान झाले होते. २३ नोव्हेंबरला निकाल जाहीर झाल्यानंतर खासदार रकीबुल हुसैन यांनी भाजपवर काँग्रेसच्या पराभवावर गोमांस वाटल्याचा आरोप केला.

सरमा म्हणाले की, विरोधी पक्षाने हा मुद्दा उपस्थित केल्याने मला आनंद झाला आहे. गोमांस वाटणे चुकीचे असल्याचे खुद्द काँग्रेस खासदारांचे मत आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष बुपेन कुमार बोरा यांनी त्यांना पत्र लिहून ही मागणी केली तर ते बंदीसाठी तयार आहेत.

गेल्या महिन्यात झालेल्या पोटनिवडणुकीत भाजपच्या दिप्लू रंजन सरमा यांनी काँग्रेस खासदार रकीबुल यांचा मुलगा तंजील यांचा २४,५०१ मतांनी पराभव केला. सलग पाचवेळा ही जागा काँग्रेसने जिंकली होती. खासदाराच्या कथित टिप्पणीवर सरमा म्हणाले, पण दु:खाच्या वेळी रकीबुल हुसैन यांनी एक चांगली गोष्ट सांगितली की गोमांस खाणे चुकीचे आहे, नाही का? काँग्रेस-भाजपने मतदारांना गोमांस देऊन निवडणुका जिंकणे चुकीचे असल्याचे ते म्हणाले.

सरमा यांनी विचारले की, मला जाणून घ्यायचे आहे की, मतदारांना वेठीस धरून काँग्रेस निवडणूक जिंकत आहे का? त्यांना साहित्य चांगलेच माहीत आहे. याचा अर्थ गोमांस देऊन समगुरी जिंकता येते का? यावर्षी धुबरी लोकसभा मतदारसंघातून १०.१२ लाखांपेक्षा जास्त मतांनी विजयी होऊन हुसैन खासदार झाले आहेत. याआधी ते सलग पाचवेळा समगुरीचे आमदार होते.

सरमा म्हणाले, मी रकीबुल हुसैन यांना सांगू इच्छितो की गोमांसावर बंदी घातली पाहिजे कारण त्यांनी स्वतःच ते चुकीचे असल्याचे म्हटले आहे. ते फक्त मला लिखित स्वरूपात देणे आवश्यक आहे. भाजप आणि काँग्रेसने गोमांसावर बोलू नये. भाजप, एजीपी, सीपीएम काहीही देऊ शकणार नाहीत आणि हिंदू, मुस्लीम आणि ख्रिश्चन सर्वांनी गोमांस खाणे बंद केले पाहिजे.

आसाममध्ये गोमांस खाणे बेकायदेशीर नाही, परंतु आसाम कॅटल प्रिझर्व्हेशन ऍक्ट २०२१ नुसार ज्या भागात हिंदू, जैन आणि शीख बहुसंख्य आहेत आणि कोणत्याही मंदिर किंवा सत्राच्या (वैष्णव मठ) परिसरात गोवंश हत्या आणि गोमांस विक्रीवर बंदी आहे.

## घरात बसणाऱ्यांना लोकांनी मतं दिली नाहीत : संजय शिरसाट



**मुंबई :** घरात बसणाऱ्यांना लोकांनी मतं दिली नाहीत असा टोला शिवसेना शिंदे गटाचे नेते आमदार संजय शिरसाट यांनी उद्धव ठाकरे गटाला लगावला आहे. संजय राऊत यांनी एकनाथ शिंदेंवर केलेल्या टीकेला प्रत्युत्तर देताना त्यांनी हा टोला लगावला आहे.

संजय शिरसाट पुढे बोलताना म्हणाले की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे जेव्हा जेव्हा दाढीवरून हात फिरवतात. तेव्हा तेव्हा राष्ट्रामध्ये मोठ्या काहीतरी घडते आणि त्यामुळे ठाण्याच्या दाढीला हलक्यात घेता कामा नये. हेच हलक्यात घेण्याचे काम ठाकरेंनी केलं आणि आता त्यांची काय अवस्था आम्ही करून ठेवली हे महाराष्ट्राने पाहिलं आहे. त्यामुळे जेव्हा शिंदे मुंबईत येतील. तेव्हा सगळ्या घडामोडी घडतील. कोणी त्यांना हलक्यात घेता कामा नये.

संजय शिरसाट म्हणाले की, संजय राऊतांमुळेच शिवसेना ठाकरे पक्ष संपला. राऊतांमुळेच शरद पवार यांच्या पक्षाला फटका बसला आणि अजूनही त्याची बडबड सुरूच आहे. राऊतांना केवळ शेतकऱ्याच्या मुलाचा अपमान करणे एवढे एकच काम उरले आहे.

संजय शिरसाट म्हणाले की ,राज्यात चांगले काम व्हावे. यासाठी या खात्यांवरती आम्ही दावा केलेला आहे. संजय राऊत आणि त्यांचे पक्षांनी आमच्यावर जो लिंबू फिरवला होता. त्याचा उतारा करण्यासाठी एकनाथ शिंदे दरेगावी गेलेत.

यापूर्वी बोलताना आमदार शिरसाट म्हणाले की, 'शिंदेंना मोठा निर्णय घ्यायचा असेल तेव्हा ते त्यांच्या मूळ गावी जातात. संध्याकाळपर्यंत ते मोठा निर्णय घेऊ शकतात.' खासदार संजय राऊत म्हणाले, 'मुख्यमंत्री नाराज होऊन गावी गेले आहेत म्हणे. अनेकदा ते नेमके अमावस्येच्या दिवशी गावी का जातात ते मला कळत नाही.'

## मनसे अध्यक्ष राज ठाकरेंना मोठा धक्का: अविनाश जाधव यांनी दिला राजीनामा



**मुंबई :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते व राज ठाकरे यांचे विश्वासू अविनाश जाधव यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. अविनाश जाधव हे ठाणे पालघरचे मनसेचे जिल्हाध्यक्ष होते. त्यांनी समाज माध्यमाच्या मीडियातून पदाचा राजीनामा दिल्याचे जाहीर केले आहे. तसेच त्यांनी पत्र देखील राज ठाकरे यांना पाठवले आहे. माफी असावी साहेब, असे म्हणत त्यांनी पदाचा राजीनामा दिला आहे.

अविनाश जाधव यांनी राजीनामा जरी दिला असला तरी अद्याप राज ठाकरे यांनी त्यांचा राजीनामा स्वीकारलेला नसल्याचे कळत आहे. त्यामुळे राज ठाकरे यावर काय निर्णय देतात हे देखील पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. अविनाश जाधव हे ठाणे शहर विधानसभा मतदारसंघातून उमेदवार होते. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपचे संजय केळकर यांच्याशी जाधव यांची लढत झाली होती. यात अविनाश जाधव यांनी १९ हजार मतांनी पराभव झाला होता.

अविनाश जाधव यांना यंदाच्या विधानसभा निवडणुकीत मोठा फटका बसला होता. भाजपच्या संजय केळकर यांनी जाधव यांचा १ लाख २० हजारांहून अधिक मते मिळवत पराभव केला. याच सोबत त्यांनी ठाकरे गटाचे राजन विचारे यांचा देखील पराभव केला. या निवडणुकीत अविनाश जाधव यांना केवल ४२ हजार मते मिळाली होती.

या निकालानंतर अविनाश जाधव यांनी ईव्हीएमवरून निशाणा साधला होता. कोविडच्या काळात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या सैनिकांनी काम केले. गेली पाच वर्षे ते काम करत होते. मात्र, ही आमदार लोकांना १०-१० वर्षे भेटले नाहीत ते लाखांच्या फरकाने निवडून आले, हे कसे शक्य आहे? ईव्हीएमशिवाय हे शक्य नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया अविनाश जाधव यांनी दिली होती.

पुढे अविनाश जाधव म्हणाले होते, विरोधी पक्ष एकत्र येऊनही काही होऊ शकत नाही. यंत्रणेने सीट आधीच सेट केल्या होत्या. भाजप विरोधात लाट दिसत होती. मात्र, त्यांनी चित्र तयार केले, लाडकी बहीण, कटेंगे तो बटेंगे, कारण त्यांनी मोठ्या यशाला कारण पाहिजे होते, असे अविनाश जाधव म्हणाले होते.

## संजय कुमार चव्हाण यांना स्टार शैक्षणिक २०२४ पुरस्कार प्राप्त




**मंठा :** येथे आयोजित करण्यात आलेल्या एक्सपो मध्ये इएसएसएफइ कडून शैक्षणिक गुणवत्तेसाठी स्टार एज्युकेशन अवॉर्ड २०२४ ने अशोका पब्लिक स्कूलचे संस्थापक संस्थाचालक श्री संजयकुमार चव्हाण यांना गौरविण्यात आले. मंठा तालुक्यात तसेच जालना जिल्ह्यात शाळेने शैक्षणिक क्षेत्रात राबविलेल्या गुणवत्ता पूर्ण शैक्षणिक उपक्रमासाठी हा पुरस्कार देण्यात आला.

शाळेमध्ये विद्यार्थ्यांसाठी विविध आकलनात्मक ग्रंथ लायब्ररी तसेच संगणक लॅब उपलब्ध असून शाळेतील विद्यार्थी मेडिकल, जेईई, सीईटी यासारख्या परीक्षांमध्ये अव्वल आहेतच क्रीडा स्पर्धांमध्ये ही शाळेतील विद्यार्थी राज्यस्तरावर सहभागी आहेत. अशी अनेक उपक्रम शाळेमध्ये राबविल्याबद्दल श्री संजय चव्हाण यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

हा पुरस्कार संस्थेसाठी व शाळेसाठी अभिमानाची बाब आहे असे वक्तव्य संजयकुमार चव्हाण यांनी व्यक्त केले. येणाऱ्या काळात शाळा यशाची अधिकारी अशी आशाही त्यावेळी यांनी व्यक्त केली. स्टार शैक्षणिक पुरस्कार मिळाल्याबद्दल शिक्षण क्षेत्रातील मान्यवर तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी संजय कुमार चव्हाण यांचे अभिनंदन केले

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २ डिसेंबर २०२४


# विश्रांतीसाठी गावी आलो, मुख्यमंत्री पदाबाबत उद्या निर्णय : एकनाथ शिंदे



**मुंबई** : राज्यात सत्ता स्थापनेचा तिढा सुरू असताना काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे अचानक त्यांच्या मूळगावी दरे येथे गेले होते. तेव्हापासून राजकारणात विविध चर्चांना उधाण आले होते. त्यांची तब्येत बिघडल्यामुळे ते आराम करण्यासाठी गावी गेल्याचे सांगण्यात आले होते.

एकनाथ शिंदे यांनी आज दरे गावात माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना सत्ता स्थापन होत असताना गावी जायचे नाही का? असा सवाल त्यांनी केला आहे. मी नेहमीच गावी येत असतो, असेही ते म्हणाले.

महायुतीमध्ये समन्वयाचा अभाव नाही. मुख्यमंत्री कोण असेल याचा निर्णय नरेंद्र मोदी, अमित शहा घेतील. मी माझी भूमिका याआधीच स्पष्ट केली आहे. भाजपचे वरिष्ठ जो निर्णय घेतील, त्याला शिवसेनेचा पाठिंबा असेल, असे स्पष्टीकरण एकनाथ शिंदे यांनी दिले. दरम्यान, यावेळी त्यांना गृहखात्यावरून सुरू असलेल्या वादाबद्दल तीनदा विचारण्यात आले. मात्र, शिंदे यांनी त्यावर बोलणे टाळले.

उपमुख्यमंत्री पदासाठी श्रीकांत शिंदे यांच्या नावाची चर्चा सुरू आहे. या सर्व चर्चा माध्यमांमध्ये सुरू आहेत. आमची अमित शहांसोबत एक बैठक झाली आहे. आता तिनही पक्षांच्या नेत्यांची दुसरी बैठक देखील लवकर होणार आहे. त्या बैठकीत चर्चा होऊन महाराष्ट्राच्या हिताचा निर्णय होईल, असे एकनाथ शिंदे म्हणाले.

आम्ही जनतेला उत्तरदायित्व आहोत. महायुतीमध्ये समन्वयाचा अभाव नाही. विरोधकांना काही काम राहिले नाही. त्यांच्याकडे विरोधी पक्ष नेता होण्याइतके संख्याबळ नाही. झारखंडमध्ये त्यांचा विजय झाला. लोकसभेतही ते जिंकले, मग तेव्हा ईव्हीएम मशीन चांगले होते का? असा सवाल विरोधकांना केला आहे.

लाडक्या बहिणींनी, लाडक्या शेतकऱ्यांनी आम्हाला भरभरून प्रेम दिले. सर्वांच्या प्रेम आणि आशीर्वादामुळे महायुतीचे सरकार प्रचंड बहुमताने आले आहे. निवडणुकीच्या काळात खूप धावपळ झाली. मी एका दिवसात ८-१० सभा घेतल्या. माझ्या अडीच वर्षांच्या कार्यकाळात सुटी घेतली नव्हती. धावपळीमुळे थकवा आला होता. त्यामुळे मी आराम करण्यासाठी गावाकडे आलो होतो. गावी आलो की वेगळे समाधान मिळते. आता माझी तब्येत ठीक आहे, असे एकनाथ शिंदे म्हणाले.

दरम्यान, भाजप विधिमंडळ पक्षाची बैठक ३ डिसेंबरला होणार आहे. मात्र, २ डिसेंबरला मुख्यमंत्रिपदाचा निर्णय होणार असल्याचे शिंदे यांनी सांगितले आहे. दिल्लीतून दोन निरीक्षक मुंबईत येणार असून आमदारांशी चर्चा करून ते अधिकृतपणे मुख्यमंत्र्यांच्या चेहऱ्याची घोषणा करतील. तर मुख्यमंत्री भाजपचा असेल आणि शिवसेना आणि राष्ट्रवादीचा प्रत्येकी १ उपमुख्यमंत्री असेल हे निश्चित झाले आहे, असे अजित पवार शनिवारी म्हणाले.

## पेन्शन धारकांचे खा. भुमरेच्या कार्यालयासमोर बैठे आंदोलन

**छत्रपती संभाजीनगर** : ईपीएस पेन्शनधारकांना अत्यल्प पेन्शन मिळते. देश सेवेसाठी आयुष्य खर्च करून उतार वयात उदनिर्वाहसाठी पैसे नसल्याने लाखो पेन्शन धारकांची प्रचंड अहवेलना होत आहे. याकडे लक्ष वेधण्यासाठी पेन्शनधारकांनी रविवारी सकाळी ११ ते २ वाजेपर्यंत खासदार संदीपान भुमरे यांच्या कार्यालयासमोर मुक बैठे आंदोलन केले. पेन्शन धारकांना ७ हजार ५०० रुपये पेन्शन मिळावे व मोफत आरोग्य सुविधा लागू कराव्यात, अशी मागणी पेन्शनर्सनी केली व मागण्यांचे निवेदन दिले.

ईपीएस राष्ट्रीय संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष कमलाकर पांगरकर म्हणाले की, आयुष्याचे ३० ते ३५ वर्ष देश सेवेत काम केलेल्या ७० लाखाहून अधिक पेन्शन धारकांना अतिशय तंटपुजे म्हणजे १ हजार रुपये पेन्शन दिली जाते. यातून पेन्शनर्सनी काय करावे? कुटुंब उदानिर्वाह चालवावा की, आरोग्य खर्च भागवावा? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. पुढे ते सांगतात की, आमच्या पगारातून दरमाह ४१७, ५४१, १२५० रुपये अंशदान कपात करण्यात आले होते.

## २०२९ ची विधानसभा जिंकायच्या तयारीला लागा : चंद्रशेखर बावनकुळे



**नाशिक** : कार्यकर्त्यांना उद्देशून बोलताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, उद्या किंवा परवा नवे मुख्यमंत्री कोण हे घोषित होणार ५ तारखेला नव सरकार महायुती सरकार स्थापन होणार हे जाहीर केले आहे. आपली जबाबदारी सरकार म्हणून तीन आहे, लोकसभा आणि विधानसभा पण आता स्थानिक स्वराज्य संस्था हा मोठा विजय मिळवायचा आहे.

आता नेत्यांच्या निवडणुका झाल्या, पुढचा विजय कार्यकर्त्यांची सत्ता, तुम्ही सत्तेत येणार ही जबाबदारी आता आमची. आपण कधीच मुख्यमंत्री पदासाठी निवडणूक लढलो नाही. आता, २०२९ ची विधानसभा जिकण्याची तयारी आजपासूनच करा, तयारीला लागा, असा आदेशच बावनकुळे यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना दिला.

नाशिक येथे महायुतीच्या १४ पैकी १४ जागांवर उमेदवार विजयी झाले आहेत. त्यामुळे येथील उमेदवारांचे अभिनंदन करण्यासाठी चंद्रशेखर बावनकुळे नाशिकमध्ये आले होते. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, पक्ष संघटनेची बैठक घेतली पाहिजे म्हणून मी नाशिकला आलो. मी ठरवले होते आज नाशिकला आलोच आहे तर प्रमुख पदाधिकाऱ्यांना भेटणार. लोकसभेत आपण थोड्या कमी मताने मागे राहिलो. विरोधकांनी केलेला खोटारडापणा होता, त्यामुळे आपला पराभव झाला. कांदा आणि आदिवासी प्रश्न, संविधान बदल ह्या खोटारडेपणाचा विरोधकांनी बाऊ केला, विरोधकांच्या खोट्या गोष्टीमुळे आपण कमी पडलो. मोदीजी आणि आपण विकसित भारत यावर बोलत गेलो आणि खोट्या गोष्टींमुळे मागे पडले, असे म्हणत बावनकुळे यांनी विरोधकांवर टीका केली आहे.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, आपण लोकसभेत प्रत्येकी बूथवर २० मतदान कमी घेतले म्हणून कमी पडलो, उशिरा पण आपला खरा विजय झाला. आपण ही लढाई स्वतः म्हणून लढलो आणि जिंकलो, महाविजय झाला. विधानसभेला आपण १४९ जागा लढलो आणि १३२ जागांवर जिंकलो, असे बावनकुळे म्हणाले.

पुढे बोलताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, लाडक्या बहिणीकडून विरोधकांना मोठा धक्का दिला. नाना पटोले मशीनवर हरले बॅलेट पेपरवर जिंकले, त्यांनी मुख्यमंत्री होणार म्हणून कोट पण शिवला होता, असा टोलाही बावनकुळे यांनी नाना पटोले यांना लगावला आहे. करंजेकर आपला कार्यकर्ता उभा होता म्हणून नाना पटोले जिंकले, नाहीतर अकरा हजार मतांनी पटोले पडले असते. रोहित पवार पण बॅलेट पेपरमुळे जिंकले, आपण काही ठिकाणी कमी मताने हरलो नाहीतर आपले १४३ आमदार असते, हा मोठा महाविजय असता.

## सरकार स्थापन होताच प्रवाशांच्या खिशाला झळ?: 'लालपरी'चा प्रवास महागण्याची शक्यता



**मुंबई** : राज्यात नवे सरकार स्थापन होताच प्रवाशांच्या खिशाला झळ बसण्याची शक्यता आहे. कारण लालपरीचा प्रवास महागणा आहे. राज्य परिवहन महामंडळाकडून एसटीची १४ ते १५ टक्के भाडेवाढ करण्याचा प्रस्ताव शासनाकडे देण्यात आला आहे. त्यामुळे लालपरीचा प्रवास महाग होणार आहे. सरकार स्थापन झाल्यावर भाडेवाढीच्या प्रस्तावावर निर्णय घेतला जाईल.

मिळालेल्या माहितीनुसार मागील तीन वर्षांपासून एसटीचे तिकीट दर स्थिर होते. तीन वर्षांपासून तिकीट दरात कोणतीही भाडेवाढ झाली नसल्याचे सांगत परिवहन महामंडळाकडून शासनाकडे भाडेवाढीचा प्रस्ताव सादर केला आहे. उत्पन्नाच्या तुलनेत खर्च भागत नसल्याचेही कारण देण्यात आले आहे. ही भाडेवाढ मंजूर झाल्यास प्रवाशांना १०० रुपयांच्या तिकिटावर १५ रुपये जादा मोजावे लागतील. सुरुवातीला परिवहन विभागाने १२.३६ टक्क्यांची किरकोळ वाढ सुचवली होती, मात्र नंतर महामंडळात झालेल्या चर्चेनंतर त्यात सुधारणा करून १४.१३ टक्के करण्यात आली. यापूर्वी २७ नोव्हेंबर २०२१ रोजी लालपरीची भाडेवाढ झाली होती.

दरम्यान, एसटी वाचविण्यासाठी सरकारला भाडेवाढीला मंजुरी द्यावी लागेल, महाराष्ट्र एसटी कर्मचारी कॉंग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी म्हटले आहे. सरकारने विविध योजनांच्या सवलतीचे पैसे महामंडळाला दिले नाहीत, असेही ते म्हणाले. एकीकडे सरकार योजनांच्या घोषणा करत सुटले आहे. दुसरीकडे त्या विविध सवलतींचे पूर्ण सवलत मूल्य सरकार देत नाही. दर महिन्याला ३५० कोटी रुपये किंवा त्यापेक्षा कमी पैसे दिले जातात. मात्र, उर्वरित पैसे दिले जात नाही. सरकारकडे डिझेलचे १५० कोटी देणे बाकी आहे. वेळ आल्यास डिझेलसाठी गाड्या थांबू शकतात, अशी भीती श्रीरंग बरगे यांनी व्यक्त केली आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून एसटी महामंडळाला दररोज १५ कोटींच्या आसपास तोटा सहन करावा लागतो. ही तूट भरून काढण्यासाठी तसेच कर्मचाऱ्यांचे वाढलेले वेतन सुरळीत देण्यासाठी त्यासोबतच इंधनाचा वाढता दर, सुट्ट्या भागांची वाढती किंमत भागविण्यासाठी ही भाडेवाढ आवश्यक असल्याचे सांगण्यात येत आहे. एसटी महामंडळाकडून पाठवण्यात आलेल्या या प्रस्तावाबाबत राज्य सरकार यावर नेमका काय निर्णय घेणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. अद्याप नव्या सरकारची स्थापना झालेली नाही. त्यामुळे सरकार स्थापन होताच, या प्रस्तावाबाबत योग्य तो निर्णय होण्याची शक्यता आहे.


शाळा, महाविद्यालय, सामाजिक व राजकीय संघटना, समाजसेवी संस्था आणि इतर समाजोपयोगी कार्यक्रमाचे व्हिडीओ क्लीप किंवा कार्यक्रमांची बातमी तयार करून पाठविल्यास आम्ही आमच्या महाराष्ट्र जनशक्ती न्युज युट्युब चॅनलवर प्रसारित करू. तसेच कार्यक्रमाच्या बातम्या व फोटो आमच्या दैनिक महाराष्ट्र जनशक्ती ऑनलाईन वृत्तपत्रामध्ये प्रकाशित करू त्याचबरोबर कविता, कथा, सामाजिक, वैचारिक लेख ही दैनिकात प्रसिद्ध करण्यात येतील.

तरी आपण 7588005002 या व्हॉट्सअॅप नंबरवर कार्यक्रमाचे व्हिडीओज, बातम्या, कथा, कविता, लेख इ. पाठवावेत.

संपादक - डॉ. हसन इनामदार